# इंटरनॅशनल बुक सर्व्हिसची 'सेकंड इनिंग'

## पुस्तकांच्या दालनाचे पाच ग्रंथप्रेमींच्या हस्ते औपचारिक उद्‌घाटन

**पुणे, ता. २ :** तो दिवस होता १ जानेवारी १९३१ चा. पुण्याच्या बुद्धिजीवी इतिहासात एक महत्त्वाचं पाऊल त्या दिवशी टाकलं गेलं. 'पुस्तकं' या गोष्टीवर अक्षरशः जीव ओवाळून टाकणाऱ्या विठ्ठलराव दीक्षित यांनी सुरू केलेल्या आणि एवढ्या प्रदीर्घ काळात अवघ्या पुण्याच्या बुद्धिसंपदेला सिंचित करणारी एक महत्त्वाची जागा म्हणून नाव कमावलेल्या 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'चा हा स्थापना दिवस होता. रविवारी १ मार्च २०१५ रोजी, आपल्या ८५ व्या वर्षी एका पूर्णतः नव्या रूपात पुणेकरांपुढे येत या पुस्तकांच्या दालनाने आपली जोरदार 'सेकंड इनिंग' सुरू केली...



डेक्कन जिमखाना : 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'च्या उद्‌घाटनानंतर एका निवांत क्षणी बसलेले हे चार 'ग्रंथप्रेमी'. (डावीकडून) उपेंद्र दीक्षित, दिलीप पाडगावकर, सदानंद मोरे आणि डॉ. अरुण टिकेकर.

वाचन संस्कृतीला एक वेगळं वळण लावणाऱ्या 'इंटरनॅशनल'ने आपली नवी इनिंग सुरू केली आहे ती 'बुकगंगा डॉट कॉम' या संकेतस्थळाच्या सहकार्याने. ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर, दिलीप पाडगावकर, साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, लेखक अच्यूत गोडबोले व निर्माते श्रीरंग गोडबोले या पाचही जणांनी प्रत्येकी एक फीत कापून नव्या 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'चे औपचारिक उद्‌घाटन केले.

एकीकडे पुस्तकांनी लगडलेल्या कपाटांनी आणि दुसरीकडे आपल्या कुटुंबातील कार्यक्रम समजून जातीने हजर झालेल्या अनेक वाचकांनी हे दालन भरून गेल्याचे चित्र होते. 'इंटरनॅशनल'चे मालक उपेंद्र दीक्षित व 'बुकगंगा'चे संस्थापक मंदार जोगळेकर यांसह साहित्यविश्वातील अनेक चेहरे या कार्यक्रमाला हजर होते.

डॉ. मोरे म्हणाले, ''पुस्तकांशिवाय माणसाच्या जगण्याची कल्पनाच होऊ शकत नाही. पुण्यातील माणसांचे जगणेच 'इंटरनॅशनल'ने एका अर्थाने समृद्ध केले. भविष्यात येऊ घातलेल्या तंत्रज्ञानाच्या वादळावर आत्ताच स्वार होत या दालनाने केलेले हे रूपांतरण स्वागतार्हच आहे.''

**ग्रंथविक्री म्हणजे ग्रंथसंस्कृती नव्हे. आपले ग्रंथप्रेम हे ग्रंथसंस्कृतीत परावर्तीत होत असते. 'इंटरनॅशनल'सारख्या दालनांनी ग्रंथविक्री तर केलीच... पण ग्रंथसंस्कृतीलाही हातभार लावण्यात मोलाची भूमिका बजावली. पूर्वी 'काय वाचावे' हे सांगणारा समीक्षकांचा वर्ग असायचा; आता मात्र सम्यक समीक्षा करणारेही दुर्दैवाने दुर्लभ झाले आहेत.**
**- डॉ. अरुण टिकेकर**

पाडगावकर म्हणाले, ''पुस्तकांची दुकाने आणि वाचनालये यालाच आम्ही देवळांच्या जागी मानत असू. 'इंटरनॅशनल'च्या रूपाने अशाच देवळात मी गेली ५० वर्षे येत आहे. पुस्तकांसोबत तुम्ही एकटेच असले, तरीही पुस्तके तुम्हाला एकटेपणा कधीही जाणवू देणार नाहीत. त्यामुळे पुस्तके जपायला हवीत.''